पु.ल. देशपांडे महाराष्ट्र कला अकादमी, मुंबई
"पु.ल.देशपांडे महाराष्ट्र कला महोत्सव २०१७-१८"
च्या खर्चास मंजूरी देणेबाबत.

महाराष्ट्र शासन
पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग
शासन निर्णय क्रमांक-पुलदे-२०१७/प्र.क्र.११३/सां.का.२
मंत्रालय,मुंबई-४०० ०३२.
दिनांक : ०२ नोव्हेंबर, २०१७.

वाचा :- १) प्रकल्प संचालक, पु.ल.देशपांडे महाराष्ट्र कला अकादमी यांचे पत्र क्र.पुलअ/४७६७, दि.२९.०९.२०१७.
२) प्रकल्प संचालक, पु.ल.देशपांडे महाराष्ट्र कला अकादमी यांचे पत्र क्र.पुलअ/४८१०, दि.१०.१०.२०१७.

शासन निर्णय :-

पु. ल. देशपांडे महाराष्ट्र कला अकादमी, मुंबई यांचेमार्फत दि. ०८.११.२०१७ ते १५.११.२०१७ या कालावधीत नृत्यलहरी, नाटयरंग, कंठ-स्वर, वाद्य निनाद, दृक कला, चित्र-टच व रंग-तरंग या कलाविष्कारांवर आधारीत "**पु.ल.देशपांडे महाराष्ट्र कला महोत्सव २०१७-१८**" चे आयोजन करण्याबाबत अकादमीने प्रस्तावित केले आहे. सदर महोत्सवांतर्गत होणाऱ्या विविध कार्यक्रमासाठी रु. ४६,००,०००/- (अक्षरी रुपये शेहचाळीस लाख फक्त) एवढया खर्चास या शासन निर्णयान्वये मंजूरी देण्यात येत आहे.

२. सदर कार्यक्रमासाठी होणाऱ्या खर्चाचे उपयोगिता प्रमाणपत्र प्रकल्प संचालक, पु.ल.देशपांडे महाराष्ट्र कला अकादमी, मुंबई यांनी शासनास सादर करावे.

३. यासाठी होणारा खर्च मागणी क्रमांक झेडडी -२, २२०५ कला व संस्कृती (०७) कला अकादमी (०७) (०१) पु.ल.देशपांडे महाराष्ट्र कला अकादमी, मुंबई (२२०५ १४६३) ५० इतर खर्च या लेखाशिर्षाखाली सन २०१७-१८ या वित्तीय वर्षातील मंजूर तरतुदीतून भागविण्यात यावा.

४. सदर शासन निर्णय वित्त विभागाने त्यांचा शासन निर्णय क्रमांक विअप्र-२०१३/ प्र.क.३०/ २०१३/ विनियम, भाग-२, दिनांक १७ एप्रिल, २०१५ सोबतच्या वित्तीय अधिकार नियम पुस्तिका भाग - एक, उपविभाग - तीन, अ. क्र. ४ नियम क्र. २७ (२) (अ) अन्वये प्रशासकीय विभागास प्रदान करण्यात आलेल्या अधिकारानुसार निर्गमित करण्यात येत आहे.

५. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०१७११०२१३३७१८७३२३ असा आहे. हा शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकीत करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Basawaraj
Gurapadappa
Saidanawaru

Digitally signed by Basawaraj Gurapadappa Saidanawaru
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Tourism And Cultural Department, postalCode=400032, st=Maharashtra,
2.5.4.20=d6e0176dd9f18c05af2af6161c960ec128aedd0d596986c8dfe46407b1ecbc13,
serialNumber=0c50ec125ac79b1ecf0a06b6a256996713c819ae428f2e0aabe4415bbcaf5a54, cn=Basawaraj Gurapadappa Saidanawaru
Date: 2017.11.02 13:49:26 +05'30'

(ब.गु.सैदानवरु)
उप सचिव, महाराष्ट्र शासन.

प्रति,

१) मा. मंत्री (सांस्कृतिक कार्य) यांचे विशेष कार्य अधिकारी, मंत्रालय, मुंबई.
२) प्रधान सचिव, पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग, मंत्रालय, मुंबई.

३) प्रकल्प संचालक, पु.ल.देशपांडे महाराष्ट्र कला अकादमी, मुंबई.
४) महालेखापाल, महाराष्ट्र-१ (लेखा व अनुज्ञेयता / लेखा परीक्षा) मुंबई.
५) अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई .
६) निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई.
७) उप सचिव, वित्त विभाग / नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई.
८) अवर सचिव, (अर्थसं.) पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग, मंत्रालय, मुंबई.
९) निवड नस्ती, सां.का.२.